NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१/७२/७३ (११ लाईन्स), संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac

ई-मेल: registrar@sus.ac.in

## अंतर्गत तक्रार निवारण समिती (Internal Complaint Committee)

**वाचा :** १) मा. ना. ॲड. यशोमती ठाकूर, मंत्री महिला व बालविकास महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे दि. १३/०५/२०२१ रोजीचे मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई यांना उद्देशून लिहिलेले अर्धशासकीय पत्र

२) मा. अ. म. बाविस्कर उपसचिव महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.४८/विशि-५ दि. २४ मे, २०२१ चे पत्र

## परिपत्रक

उपरोक्त संदर्भ क्र. ०१ व ०२ च्या अनुषंगाने आदेशान्वये कळविण्यात येते की, कामाच्या ठिकाणी महिलांना संरक्षण मिळावे, महिला कर्मचाऱ्यांना व विद्यार्थिनींना महाविद्यालयात सुरक्षित वातावरण उपलब्ध करुन देणे यासाठी "कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ" (प्रतिबंध, मनाई आणि तक्रार निवारण) कायदा २०१३ नुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व संलग्नित महाविद्यालयांत अंतर्गत तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली आहे.

सदर कायद्याची जनजागृती होण्याच्या दृष्टीने महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरु होत असतानाच विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या माहितीपुस्तिकेत "कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ" (प्रतिबंध, मनाई आणि तक्रार निवारण) कायदा २०१३ च्या कायद्याचे स्वरुप महाविद्यालयात असलेली तक्रार निवारण समिती इत्यादीबाबतची माहिती देण्यात यावी वा माहितीचा समावेश करण्यात यावा.

आदेशान्वये,

(प्रा. डॉ. वि. भा. घुटे)
प्र. कुलसचिव

जा.क्र. : पुअहोसोविसो/आस्था/अं.त.नि.स./२०२१/ 3820

दिनांक : 31 MAY 2021

**प्रति,**

१. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, पुअहोसोविसो
२. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ
३. पी. जी. प्रवेश विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
४. मा. कुलगुरु महोदय यांचे कार्यालय
५. मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय
६. मा. कुलसचिव महोदय यांचे कार्यालय

**प्रत : मा. अ. म. बाविस्कर,** उपसचिव महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, कक्ष क्र. ४१४, चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, **मुंबई - ४०००३२.**

Outward No. Minister/WCD/MP/591
Date : 13/05/2021

मंत्री
महिला व बालविकास
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
minister_wcd@gov.in

दिनांक : 13/05/2021

विषय : महाविद्यालयांमध्ये "कामाच्या ठिकाणी महिलांचे लैगिंक छळापासून अत्याचार अधिनियम, २०१३" जनजागृतीबाबत.

महोदय,

महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरु होत असतानाच विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या माहिती पुस्तिकेत विद्यार्थ्यांची छेडछाड, लैगिंक छळ रोखण्याकरीता असलेला कायदा, त्याचे स्वरुप, संबंधीत महाविद्यालयात असलेली तक्रार निवारण समिती आदीबाबत माहिती दिल्यास महाविद्यालयात होणाऱ्या अशा घटनांना आळा बसु शकतो व जनजागृती होऊ शकते.

तेव्हा महाविद्यालयांना प्रवेश पुस्तिकेत व संकेतस्थळावर अशी माहिती देणे बंधनकारक करावे, ही विनंती.

(ॲड. यशोमती ठाकूर)

प्रति,

प्रधान सचिव,
उच्च व तंत्रशिक्षण.
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मंबई.

**महाराष्ट्र शासन**

क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.४८/विशि-५
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४१४,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
दि. २४ मे, २०२१

प्रति,

१) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे
२) शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
३) संचालक, तांत्रिक शिक्षण संचालनालय, मुंबई

विषय : महाविद्यालयांमध्ये "कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ" (प्रतिबंध, मनाई आणि तक्रार निवारण) कायदा, २०१३ च्या जनजागृतीबाबत.

संदर्भ : मा. मंत्री, महिला व बालविकास यांचे दिनांक १३ मे, २०२१ रोजीचे पत्र.

महोदय,

कामाच्या ठिकाणी महिलांना संरक्षण मिळावे, महिला कर्मचाऱ्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करुन देणे यासाठी "कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ" (प्रतिबंध, मनाई आणि तक्रार निवारण) कायदा, २०१३ हा कायदा करण्यात आला आहे.

या कायद्याची जनजागृती होण्याच्या दृष्टीने महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरु होत असतानाच, विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या माहिती पुस्तिकेत "कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ" (प्रतिबंध, मनाई आणि तक्रार निवारण) कायदा, २०१३ च्या कायद्याचे स्वरुप, महाविद्यालयात असलेली तक्रार निवारण समिती आदीबाबत माहितीचा समावेश करण्याच्या दृष्टीने सर्व महाविद्यालयांना/शैक्षणिक संस्थांना सूचना देण्यात याव्यात.

तसेच याबाबतची माहिती महाविद्यालयांच्या / शैक्षणिक संस्थांच्या संकेतस्थळावर देण्यात यावी. तसेच कार्यवाही पूर्ततेबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

आपला,

(अ.म. बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

E:\prasad २०२०\पत्र २०२०.docx